## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती-२०१७ साठी ऑनलाईन अर्जासाठी सूचना काळजीपूर्वक वाचा.

महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती-२०१७ साठी अर्ज भरायला सुरुवात करण्यापूर्वी व नंतरचा संभाव्य गोंधळ टाळण्यासाठी सर्व माहिती व आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे हाताशी तयार असल्याची खातरजमा करून घ्या. अधिक मार्गदर्शनासाठी खालील तपास सूची पाहा.

**१. तपास सूची:**

| | | |
|---|---|---|
| **ई-मेल आयडी** | कृपया तुमच्या नियमित वापरातल्या आणि वैध ई-मेल आयडी ची नोंद करा. नियमित सूचना प्राप्त करण्यासाठी स्पॅम फिल्टर अद्यावत करा. सादर केलेला ई-मेल आयडी वैध असल्याची खातरजमा करून घ्या, कारण पुढील पत्रव्यवहार याच ई-मेल आयडी वर केला जाईल. उमेदवार खालील पदांसाठी अर्ज करु शकतात<br>१. पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (जिल्हा व शहर पोलीस दल)<br>२. पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (लोहमार्ग)<br>३. पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (राज्य राखीव पोलीस बल)<br>४. कारागृह शिपाई | ✓ |
| **भ्रमणध्वनी क्र.** | नियमीत सूचना प्राप्त करण्यासाठी वैध भ्रमणध्वनी क्रमांकाची नोंद करणे अनिवार्य आहे. आपल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर एसएमएस द्वारे नियमित सूचना पाठविल्या जातील. | ✓ |
| **छायाचित्र व स्वाक्षरी** | परिक्षेचा अर्ज भरताना स्वाक्षरी आणि छायाचित्राची स्कॅन केलेली प्रत अपलोड करणे आवश्यक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत (Latest) फोटो जेपीईजी / पीएनजी / टीआयएफएफ स्वरुपातच (रुंदी १६० पिक्सेल आणि उंची २०० ते २१२ पिक्सेल असावी.) आणि आकार ५ k.b. ते २० k.b. दरम्यान होईल असा असावा व स्वत:ची स्वाक्षरी, जेपीईजी / पीएनजी / टीआयएफएफ स्वरुपातच (रुंदी २५६ पिक्सेल आणि उंची ६४ पिक्सेल असावी.) आणि स्वाक्षरीचा आकार ५ k.b. ते २० k.b. दरम्यान होईल अशा विहीत पद्धतीने स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे. | ✓ |
| **दस्तऐवज** | नक्षलग्रस्त क्षेत्रासाठी इयत्ता सातवी उत्तीर्ण / बॅन्डस्मनसाठी इयत्ता दहावी उत्तीर्ण / पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई या पदांसाठी इयत्ता बारावी उत्तीर्ण गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, अंशकालीन प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, खेळाडू प्रमाणपत्र, माजी सैनिक प्रमाणपत्र, गृहरक्षक प्रमाणपत्र, पोलीसाचे अपत्य असल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रे आवश्यक आहेत. | ✓ |

- **वयोमर्यादा निश्चितीकरिता दिनांक :-** (Cut off Date) : १) पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (जिल्हा व शहर पोलीस दल), २) पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (लोहमार्ग), ३) पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (राज्य

राखीव पोलीस बल) ४) कारागृह शिपाई पदांसाठी उमेदवारांच्या **वयोमर्यादेसाठी दिनांक** ३१/०३/२०१७ असा असेल.

- **शैक्षणिक पात्रता**:- १) पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (जिल्हा व शहर पोलीस दल), २) पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (लोहमार्ग), ३) पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (राज्य राखीव पोलीस बल) ४) कारागृह शिपाई या पदांसाठी इयत्ता बारावी उत्तीर्ण आणि पोलीस शिपाई पद,नक्षलग्रस्त क्षेत्रासाठी इयत्ता सातवी, व बँड्समनसाठी इयत्ता दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

## २. अर्ज करण्याची पद्धत:

**आवेदन अर्ज** :- (Application Form): २०१७ च्या पोलीस शिपाई भरतीसाठी आवेदन अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येणार आहेत. त्याकरिता महाऑनलाईन लि. या संस्थेची निवड करण्यात आली आहे. उमेदवारांकडून आवेदन अर्ज भरुन घेण्याकरिता https://mahapolice.mahaonline.gov.in हा वेब पोर्टल निर्माण करण्यात आला आहे. उमेदवारांना अर्ज खालील दोन प्रकारे भरता येईल.

१. **अ) इंटरनेटव्दारे ऑनलाईन:-** पात्र उमेदवारांनी वेब-बेस्ड (Web-Based) ऑनलाईन आवेदन अर्ज mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दि. २४/०२/२०१७ ते दि. १७/०३/२०१७ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
२. क्रेडीट किंवा डेबीट कार्ड द्वारा परिक्षा शुल्क भरताक्षणी आवेदन कर्त्यास रक्कम प्राप्त झाल्याचा संदेश (Confirmation) प्राप्त होईल आणि त्यांचे ऑनलाईन ॲप्लीकेशन पुर्ण होईल.
३. बँकेत चलन भरल्यानंतर ४८ तासानंतर Transaction ID आपोआप Update होईल उमेदवाराने त्याची पडताळणी (Application Status) मध्ये करावी. तसेच Transaction ID Update झाल्याचा संदेश SMS द्वारे प्राप्त होईल.
४. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत (Latest) फोटो जेपीईजी / पीएनजी / टीआयएफएफ स्वरुपातच (रुंदी १६० पिक्सेल आणि उंची २०० ते २१२ पिक्सेल असावी.) आणि आकार ५ k.b. ते २० k.b. दरम्यान होईल असा असावा व स्वत:ची स्वाक्षरी, जेपीईजी / पीएनजी / टीआयएफएफ स्वरुपातच (रुंदी २५६ पिक्सेल आणि उंची ६४ पिक्सेल असावी.) आणि स्वाक्षरीचा आकार ५ k.b. ते २० k.b. दरम्यान होईल अशा विहीत पद्धतीने स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे.
५. ***परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे लागू राहील.***

| अ.क्र. | पदाचे नाव | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | पोलीस शिपाई | रु. ३५०/- | रु. २००/- |
| २ | पोलीस शिपाई / बॅन्डस्मन | रु. ३५०/- | रु. २००/- |
| ३ | कारागृह शिपाई | रु. ३५०/- | रु. २००/- |
| ४ | माजी सैनिक (फक्त सेवाशुल्क) | रु. ५०/- | रु. ५०/- |

**(टिप:- फोटो व सही अपलोड केल्यानंतर उमेदवाराने स्वत:चाच फोटो व सही अपलोड झाल्याची खात्री करावी. प्रवेशपत्रावर / अर्जावर दुसऱ्याचा फोटो / सही असल्यास सदर उमेदवारास भरतीच्या ठिकाणी प्रवेश दिला जाणार नाही.)**

**ब) महा-ई सेवा केंद्र (C.S.C.) :-** ज्या उमेदवारांना इंटरनेटद्वारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल असे उमेदवार महा ई-सेवा केंद्रामार्फत आपला आवेदन अर्ज भरू शकतात. त्याचवेळेस खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून रु.३५०/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांकडून रु. २००/- एवढे परिक्षा शुल्क आकारले जाईल. तसेच, माजी सैनिक असलेल्या उमेदवारांकडुन रु. ५०/- एवढे सेवाशुल्क आकारले जाईल. **याव्यतिरिक्त महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मातंस/२०१२/प्र.क्र.१५२/३९, दि.२३/०५/२०१२ नुसार महा-ई सेवा केंद्राचे लागु असलेले अतिरीक्त शुल्क उमेदवारांस लागु राहील.** या सुविधामध्ये आवेदन अर्ज भरणे, पैसे भरल्यानंतर ट्रॅन्झॅक्शन आयडी तयार करणे इत्यादींचा समावेश असेल. उमेदवारास पैसे भरल्याची पावती (Receipt) महा-ई सेवा केंद्रातर्फे देण्यात येईल.

इतर कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती जर महा-ई सेवा केंद्रा (C.S.C.) कडून हव्या असतील तर, सदरच्या प्रती रु. ३/- प्रती पान या दराने उपलब्ध होऊ शकतील. फॉर्म भरताना उमेदवाराने स्वत:चा ई-मेल आय-डी देणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे ई-मेल आय-डी नसल्यास केंद्र चालक उमेदवाराच्या सांगण्याप्रमाणे त्याचा वैयक्तीक ई-मेल आय-डी तयार करुन पडताळणी (verification) करतील. याकरिता कुठलेही अतिरीक्त शुल्क घेतले जाणार नाही. उमेदवारांना पोलीस भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेबाबतची माहिती रुपरेखा (Schedule) mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

**३. अर्ज करण्याचे ४ सुलभ टप्पे:-**

i. नोंदणी
ii. लॉग-ईन
iii. अर्ज करणे
iv. शुल्क भरणा करणे

**सविस्तर कार्यपद्धती:-**

**i. नोंदणी करण्याची पद्धत.**

१. मुख्य पृष्ठावरील “नवीन नोंदणी करा” या लिंकवर क्लिक करा.
२. अचूक ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांकाची नोंद करा.
३. खालील पासवर्ड धोरणानूसार उमेदवाराला पासवर्डची निवड करावी लागेल.
   - पासवर्ड मध्ये ० ते ९ पैकी किमान एक अंक असावा.
   - लहान आणि मोठ्या लिपीतील किमान एका वर्णाचा / अक्षराचा समावेश असावा.
   - अप्पर केस आणि लोअर केस मधील किमान एका वर्णाचा समावेश असावा.
   - @, #, $, %, यापैकी किमान एका विशेष चिन्हांचा समावेश असावा आणि पासवर्डमध्ये किमान ७ आणि कमाल २० वर्णांचा समावेश असावा.
४. लॉग ईन करण्यासाठी हा पासवर्ड जपुन ठेवा.

ii **लॉग-ईन.**

१. तुमच्या ई-मेल आयडी वर एक पडताळणी लिंक तात्काळ पाठविली जाईल, ही लिंक नोंदणी च्या वेळेपासून ३ दिवस(७२ तास) वैध राहील. उमेदवाराला स्वत:च्या ई-मेल आयडी वर आलेली लिंक पडताळणी करणे बंधनकारक राहील. या कालावधीत नोंदणी पूर्ण न झाल्यास सदर नोंदणी प्रक्रिया ग्राह्य धरली जाणार नाही व उमेदवाराला पुन्हा नोंदणी करावी लागेल.
२. पडताळणी लिंकवर क्लिक केल्यानंतर तुम्ही मुख्य पृष्ठावर पोहचाल.

iii **अर्ज करण्याची पद्धत:-**

१. उमेदवाराने मुख्य पृष्ठावर लॉग ईन करुन आपला आवेदन अर्ज भरावा.
२. सदर अर्ज भरताना पद व घटक निवडा.
३. प्रोफाईलमधील सर्व माहिती भरुन जातीची वर्गवारी व जन्मतारखेची नोंद करा.
४. संपर्क तपशीलामध्ये संपूर्ण पत्ता अचूक भरावा.
५. इतर तपशीलामध्ये राष्ट्रीयत्व, भाषा इ.ची नोंद करा.
६. शैक्षणिक तपशीलामध्ये गुणपत्रिकेची सविस्तर माहिती भरा.
७. आवेदन अर्ज पूर्ण भरल्यानंतर तुम्हाला ई-मेल व एसएमएस द्वारे एक टोकन नंबर (Token No.) मिळेल. हा टोकन नंबर (Token No.) भविष्यकाळासाठी जपुन ठेवावा.
८. आवेदन अर्जाचे शुल्क भरणा केलेनंतर उमेदवारास Application ID प्राप्त होईल. हा Application ID भविष्यकाळासाठी जपुन ठेवावा.
९. आवेदन अर्ज भरल्यानंतर पारपत्र आकाराचे छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करा. प्रतिमा प्रमाणबद्ध करण्यासाठी स्क्रीनवर दिलेल्या सूचनांचे पालन करा. प्रवेशपत्रासाठी हे छायाचित्र आवश्यक आहे.
१०. १) पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (जिल्हा व शहर पोलीस दल), २) पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (लोहमार्ग), ३) पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (राज्य राखीव पोलीस बल) ४) कारागृह शिपाई पदांसाठी स्वतंत्र नोंदणी करून आवेदन अर्ज दाखल करण्यात यावा.

iv **शुल्क भरणा करणेची पद्धत:-**

१. **शुल्क भरणा**:- आपले छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर शुल्क भरणा करा. त्यासाठीचे पर्याय पुढीलप्रमाणे आहेत.

   i. **डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड व एनईएफटी**: उमेदवार ऑनलाईन पद्धतीने डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड व एनईएफटी तसेच पेटीएम इत्यादी व्दारे शुल्क भरणा करु शकतात.

   ii. **स्टेट बँक ऑफ इंडियाचे चलन:-** संकेतस्थळावर आवेदन अर्ज भरुन झाल्यानंतर बँक चलन डाऊनलोड करता येईल. अर्जदार एसबीआयच्या कोणत्याही शाखेत जाऊन शुल्क भरणा करू शकेल. शुल्क भरणा बँकेच्या कार्यालयीन वेळेत (अर्ज स्विकारणाच्या शेवटच्या तारखेआधी) अर्ज भरल्यानंतर २ तासांनी शुल्क भरता येईल.

   iii. **कॉमन सर्व्हिस सेंटर्स (सीएससी):-** अर्जदाराला महाराष्ट्रात कुठूनही सीएससी मार्फत अर्ज करता येईल. संकेतस्थळावर सीएससी ची यादी प्रदर्शित केलेली

आहे. **CSC** द्वारे अर्ज सादर केल्यास, **महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मातंस/२०१२/प्र.क्र.१५२/३९, दि.२३/०५/२०१२ नुसार महा-ई सेवा केंद्राचे लागु असलेले अतिरीक्त शुल्क उमेदवारांस लागु राहील.**

iv. **अर्ज रद्द करणे:** अर्ज भरल्यानंतर उमेदवाराला तो रद्द करावयाचा असल्यास अथवा दुसऱ्या घटकासाठी अर्ज करावयाचा असल्यास आधी केलेला अर्ज रद्द करून पुन्हा त्या पदासाठी लागू असलेले शुल्क भरून नव्याने अर्ज करता येईल.

v. अर्ज रद्द करण्याच्या प्रक्रियेवेळी उमेदवाराने नोंदणी केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर **OTP (ONE TIME PASSWORD)** पाठविला जाईल त्या पासवर्डची नोंद केल्याशिवाय अर्ज रद्द होणार नाही.

vi. पोलीस भरती २०१७ साठी उमेदवारांना खालील पदांसाठी आवेदन अर्ज भरता येणार आहे.

१. पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (जिल्हा व शहर पोलीस दल)
२. पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (लोहमार्ग)
३. पोलीस शिपाई / बॅन्डस्मन (राज्य राखीव पोलीस बल)
४. कारागृह शिपाई

**वरील पदांसाठी उमेदवारांस प्रत्येक पदासाठी नव्याने नोंदनी करुन आवेदन अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. (वरील सर्व पदांसाठी वेगवेगळे ई-मेल आयडी तयार करुन आवेदन अर्ज सादर करावेत) व सर्व पदांसाठी स्वतंत्ररित्या परिक्षा शुल्क आकारले जाईल.**

४. **प्रवेश पत्राचे वाटप** :- ऑनलाईन आवेदन अर्ज संपुर्ण भरुन झाल्यानंतर वेळापत्रकाप्रमाणे उमेदवाराला प्रवेश पत्र (Admit Card) पाठविण्यात येईल. या प्रवेशपत्रामध्ये हजर राहण्याची तारीख, वेळ व ठिकाण इत्यादी गोष्टींचा समावेश असेल. प्रवेश पत्र महाऑनलाईनकडून उमेदवाराच्या ई-मेल वर पाठविण्यात येईल. उमेदवारास सदर प्रवेशपत्राची प्रिंट आऊट घेऊन भरतीचे वेळी व ठिकाणी हजर रहावे लागेल. सदर प्रवेशपत्राची प्रिंट आऊट उमेदवार स्वत: https://mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरील आपले प्रोफाईल वर जाऊन घेऊ शकतात. अथवा प्रवेशपत्राची प्रिंट आऊट महा-ई सेवा केंद्रावर (C.S.C.) रु. ३/- प्रती प्रत दराने उपलब्ध करुन घेऊ शकतात. उमेदवारांना पोलीस भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेची रुपरेखा (Unit wise schedule) https://mahapolice.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. तसेच सर्व घटक प्रमुख संबंधित मुख्यालयाच्या नोटीस बोर्डवर तसेच घटक प्रमुखांना आवश्यक वाटेल अशा इतर ठिकाणीही ठळक अक्षरात भरती प्रक्रियेची रुपरेखा (Unit wise schedule) लावण्यात येईल.

५. **प्रमाणपत्रांचा निश्चीती दिनांक** (cut off date):- अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दि. १७/०३/२०१७ पर्यंत सर्व प्रमाणपत्रे व अर्हता प्राप्त करुन घेणे उमेदवारांवर बंधनकारक राहिल म्हणजेच अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर प्राप्त करुन घेण्यात आलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही. गृहविभाग शासन पत्र क्र. आरसीटी-०३१०/प्र. क्र. २१२/पोल - ५अ, दि. १६/०४/२०१० नुसार क्रिमीलीयरचे तत्व लागू करण्यात आलेल्या मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना जाती प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अशी दोन्ही प्रमाणपत्रे असतील तरच आरक्षण विषयक लाभ देय ठरतो. ही दोन्ही प्रमाणपत्रे नसतील

तर आरक्षण विषयक लाभ देय ठरणार नसून अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणून अर्ज भरता येईल, त्यांना खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या वयोमर्यादेच्या अटी त्यांना लागू राहतील.

६. **गुणवत्ता यादी** :- उमेदवारांची " शारीरिक चाचणी " व " लेखी चाचणी " मध्ये प्राप्त केलेले गुण एकत्रित करुन गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. बॅन्ड्समनची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. शेवटच्या उमेदवारांची लेखी चाचणी परीक्षेचा निकाल लागल्यानंतर शक्यतो २४ तासात अथवा उमेदवारांची संख्या मोठी असल्यास लवकरात लवकर भरतीचा अंतिम निकाल सूचना फलकावर लावुन जाहिर करण्यात येईल. २४ तासांच्या आत अंतिम निकाल जाहिर करणे शक्य नसल्यास, सूचना फलकावर तशा सूचना लिहून निश्चित तारीख व वेळ लावण्यात येईल. तसेच निकाल वेबसाईटवर उपलब्ध करुन दिला जाईल.

७. **निवड यादी व प्रतिक्षायादी**:- प्रतिक्षायादी फक्त त्या भरतीमधील निवड झालेला उमदेवार अपात्र ठरल्यास / गैरहजर राहील्यास लागू होईल. भविष्यात रिक्त होणा-या पदांसाठी सदरची निवड यादी लागू होणार नाही. तसेच भरतीच्या वेळी जितक्या जागा अधिसुचित करण्यात आल्या असतील तेवढयाच जागांची निवड यादी (प्रतिक्षा यादीसह) ही सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रनिमं / २००७ / प्र.क्र.४६ /०७ / १३-अ, दि. २७/०६/२००८ व प्रनिमं / १०११ / प्र.क्र.९९ / ११ / १३-अ, दि. २६/१२/२०११ तसेच प्रनिमं / १२१५ / (प्र.क्र. ५५ / १५) / १३- अ, दि. ०५/१०/२०१५ मधील तरतुदीनुसार अस्तित्वात राहील.

८. **मदतीसाठी:-**

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खाली दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर त्यांनी नोंदणी केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावरून, सकाळी ०८.०० ते रात्रौ ०८.०० या वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक / ई- मेल. |
|---|---|---|
| १ | अर्ज भरण्यास काही अडचण असल्यास | ९०१५९७८९७८ (IVR Base Support)<br>e-mail id : mahapolice.support@mahaonline.gov.in |
| २. | भारतीय स्टेट बॅंकेच्यासंदर्भात अडचण असल्यास | ०२२-२२६६१७६५ |
| ३. | पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक / समादेशक कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | येथे घटक कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक नमूद करावा. |
| ४. | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यालयीन वेळेत) | ०२२- २२०२३६३७ |
| ५. | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांचे **e-mail id:-** | adg.training.mumbai@mahapolice.gov.in |